ePaper

**महाराष्ट्रात 2.14 लाख बांगलादेशी रोहिंग्यांचा जन्म दाखल्यासाठी अर्ज : किरीट सोमय्या**



महाईन्यूज ™

**आतील पानांत**


- इंडियाची विजयाची हॅट्रिक हुकली!
- बाबा...विराट खरंच तुमचा मित्र आहे?
- आप हा पक्ष भ्रष्टाचाराच प्रतीक
- उत्तर प्रदेशातील बागपतमध्ये दुर्घटना


www.mahaenews.com | बुधवार, दिनांक 29 जानेवारी 2025 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## दोषींना पाठिशी घालणार नाही, कारवाई होणार

# तूर्तास धनंजय मुंडे यांचा राजीनामा नाही?

### दमानियांचे पुरावे, मुख्यमंत्र्यांची भेट; अजित पवार म्हणाले चौकशी सुरू

। मुंबई । महाईन्यूज

**ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती, त्यांनी मंत्री धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली, त्यानंतर आज अजित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे, या भेटीकडे राज्याचं लक्ष लागलं होतं. धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याबाबत या भेटीत काय निर्णय होणार याबाबत मोठी उत्सुकता होती, त्यावर आता अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे.**



#### नेमकं काय म्हणाले अजित पवार?

दमानिया यांनी काही कागदपत्रं माझ्याकडे दिली आहेत. मी ती घेतली पाहिली. मी आज रात्री मुख्यमंत्र्यांची भेट घेणार होतो. पण त्यांना नागपूरला जायचं असल्यानं मी त्यांना आत्ताच भेटलो. त्यांनी मला सांगितलं तुम्हाला जशा दमानिया भेटल्या तशा त्या मलाही भेटल्या. मलाही त्यांनी काही कागदपत्रं दिले आहेत. या प्रकरणात तीन प्रकारच्या चौकशा सुरू आहेत. एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन. ही कागदपत्रे मी सीआयडी आणि एसआयटीकडे दिली आहेत. कुणी पुरावे दिले तर त्याची शहानिशा करावी लागते, म्हणून ते सीआयडी आणि एसआयटीकडे देण्यात आले आहेत. जी वस्तुस्थिती समोर येईल त्यानुसार पुढच्या गोष्टी काय करायच्या ते ठरवलं जाईल, असं मुख्यमंत्री यांनी सांगितल्याचं अजित पवार यांनी म्हटलं आहे. दरम्यान ते पुढे बोलताना म्हणाले की, मी आणि मुख्यमंत्र्यांनी आधीपासूनच सांगितलं. जी घटना सरपंचांच्याबाबत बीड जिल्ह्यात घडली. त्याची चौकशी सुरू आहे. दोषी असतील त्यांना फाशी दिली पाहिजे, तसा प्रयत्न सुरू आहे. चौकशी चालू आहे. कुणाची आणखी नावे आली तर त्यावरही कारवाई केली जाईल. पण कुणाचा संबंधच नसेल तर कारवाईचा प्रश्नच येत नाही. संबंध असेल तर कुणालाही पाठी घालणार नाही. ही माझी, मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे.

माझ्यावर आरोप झाले, तेव्हा मी राजीनामा दिला होता. माझी गोष्ट वेगळी होती. माझ्या वेळी जी घटना घडली होती मला ते असह्य झालं, म्हणून मी राजीनामा दिला. आता चौकशी सुरू आहे. दोषींना पाठिशी घालणार नाही, कारवाई केली जाईल, असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

#### दमानियांच्या पुराव्याची चर्चा

अंजली दमानिया यांनी काही महत्त्वपूर्ण कागदपत्रं अजित पवार यांच्याकडे सादर केली, जी त्यांनी योग्य चौकशीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे देण्यात आली. अजित पवार यांनी या कागदपत्रांची शहानिशा केली असून, त्यांचा यथासंभव पुरावा तीन तपास यंत्रणांच्या, म्हणजेच एसआयटी, सीआयडी आणि न्यायालयीन चौकशा यांना पाठवण्यात आला आहे. त्यांनी स्पष्ट केलं की, कोणताही पुरावा असला तरी त्याची योग्य तपासणी करणे आवश्यक आहे.

#### चौकशीची प्रक्रिया

मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेणारे अजित पवार यांनी त्यांच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेची एक महत्त्वाची गोष्ट सांगितली. “तीन प्रकारच्या चौकशा सुरू आहेत, आणि त्यावर योग्य निर्णय घेतला जाईल. सर्व पुरावे योग्य तपासणीसाठी संबंधित यंत्रणांकडे पाठवले गेले आहेत. चौकशी पूर्ण होईल आणि जी वस्तुस्थिती समोर येईल, त्यानुसार पुढील पावले उचलली जातील,” असे ते म्हणाले.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुन्हा लांबणीवर

### पुन्हा एका तारीख पे तारीख, पुढील सुनावणी 25 फेब्रुवारीला..!

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता सर्वच राजकीय पक्षांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे वेध लागले आहेत. एकीकडे ठाकरे गटाने स्वबळाचा नारा दिला आहे. तर राज्यातील इतर पक्षांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे. दरम्यान, आज गेल्या ४ वर्षांपासून लांबणीवर पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसदर्भात सुनावणी पार पडली. सर्वोच्च न्यायालयात आज २३ व्या नंबरवर राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका व ओबीसी आरक्षण यांच्यातील याचिकेवर अंतिम सुनावणी होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. मात्र, पुन्हा एका तारीख पे तारीख, पुढील सुनावणी २५ फेब्रुवारीला होणार आहे.**



ओबीसी आरक्षणाचा मुद्दा रखडल्याने राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयाकडे याबाबत निर्णय घेण्याची विनंती केली होती. त्यातच, आज न्यायालयात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यासंदर्भात काही जणांनी न्यायालयाचा दरवाजा ठोठावला. ओबीसी आरक्षण असो की नसो पण निवडणुका व्हाव्यात अशी मागणी या याचिकाकर्त्यांनी केली.

या प्रकरणी आज सुनावणी झाली असून न्यायालयाने २५ फेब्रुवारी ही नवी तारीख दिली आहे. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणखी काही काळ पुढे ढकलण्यात आल्या आहेत. न्यायालयाच्या निर्णयानुसार, जर २५ फेब्रुवारीला होणाऱ्या सुनावणीत स्थगिती उठल्यास एप्रिल-मे मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

#### निवडणुका प्रलंबित

या निवडणुकांच्या भविष्यासाठी २५ फेब्रुवारी ही तारीख अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. राज्यातील २९ महागनरपालिका, २५७ नगरपालिका, २६ जिल्हा परिषद आणि २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे सर्वांचे लक्ष वेधलं आहे.

# पुणेकरांच्या सुरक्षेसाठी 'कॉप्स-24'चे कवच!

## संकटात असाल तर तत्काळ मदत: बीट मार्शलचे अद्ययावतीकरण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**तुम्ही पोलीस नियंत्रण कक्षाला कॉल देताच मदतीसाठी धावून येणारे बीट मार्शल आता कॉप्स-24 या नावाने ओळखले जाणार आहेत. पोलीस ठाण्याचा बीट मार्शल हा उपक्रम बंद होणार असून, त्याची जागा कॉप्स-24 घेणार आहेत. अंमलदारांना प्रशिक्षण देण्याचे काम सध्या सुरू असून, त्यांच्यासाठी वेगळा ड्रेसकोड असणार आहे.**



### रिस्पॉन्स टाईम येणार 5 मिनिटांवर



कॉप्स - 24 मध्ये महिला आणि पुरूष मिळून 726 अंमलदार.
अंमलदारांची वयोमर्यादा 21 ते 30.
रिस्पॉन्स टाईम 7 मिनिटांवरून 5 मिनिटांवर आणण्यासाठी प्रयत्न.
कॉप्स-24 साठी 125 दुचाकी आणि 39 चारचाकी वाहने.
दोन सत्रात (दिवस-रात्र) पेट्रोलिंग, प्रत्येक पोलिस ठाण्यासाठी एक कार.
शहरातील महत्त्वाचे चौक, रस्ते तसेच नागरिकांची गर्दी असणाऱ्या ठिकाणी कार उभी केली जाणार.
काही घटना घडल्यास, तत्काळ पोहचून मदत व प्राथमिक कार्यवाही.

गुन्हे शाखेच्या खांद्यावर कॉप्सच्या नियंत्रणाची जबाबदारी देण्यात आली आहे. दिवस आणि रात्रपाळीत त्यांचे कामकाज चालणार आहे. सीआर मोबाईलसाठी 234 तर कॉप्ससाठी 492 अशा 726 महिला आणि पुरुष अंमलदारांचा समावेश करण्यात आला आहे. शहरातील कायदा आणि सुव्यवस्था, परिणामकारक पेट्रोलिंग, अडचणीतील नागरिकांना तत्पर पोलीस मदत, पोलिसांचा रस्त्यावरील वावर, नागरिकांच्या मनात सुरक्षिततेचे वातावरण तयार करून पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्याकरीता कॉप्स-24 हा उपक्रम हाती घेण्यात आल्याचे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले.पुणे पोलिसांकडून सध्या पोलीस ठाणे स्तरावर बीट मार्शल ही संकल्पना राबविले जाते. प्रत्येक पोलीस चौकीला रात्री आणि दिवसपाळी दोन-दोन अंमलदार बीट मार्शल म्हणून काम करतात. पोलीस ठाण्यात उपलब्ध असलेल्या मनुष्यबळावर त्यांची संख्या असते.

रस्त्यावरील गुन्हेगारी कमी करण्यासह एखादा गुन्हा घडल्यानंतर तात्काळ मदत आणि नागरिकांच्या मनात सुरक्षिततेचे वातावरण सोबतच त्यांना अडचणीच्या काळात त्वरीत मदतीसाठी ही बीट मार्शल ही संकल्पना राबविली जात होती. मात्र मनुष्यबळ तसेच पोलीस ठाण्याच्या कामाचा ताण यामुळे प्रभावी पेट्रोलिंग होत नसल्याचे पोलीस आयुक्तांच्या निदर्शनास आले. तर काही बीट मार्शलचे भलतेच उद्योग निदर्शनास आले. त्यामुळे बीट मार्शलचा मुख्य उद्देश साध्य होत नसल्यामुळे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी बीट मार्शलपेक्षा प्रभावी कामकाज व्हावे, यासाठी कॉप्स-24 ही संकल्पना सुरू केली आहे.

### वर्तन सौदार्ह आणि सौजन्याचे

कॉप्स-24 मध्ये काम करणाऱ्या अंमलदारांना नागरिकांसोबत आपले वर्तन सौदार्ह आणि सौजन्याचे ठेवण्याच्या सूचना पोलिस आयुक्तांनी दिल्या आहेत. विशेष महिलांचा सन्मान करण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. नागरिकांना शिवीगाळ अथवा मारहाण करू नये. पोलिस दलाची प्रतिमा मलिन होऊ नये, असे वर्तन न करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

### असे काम करणार कॉप्स-24

कॉप्स 24 या उपक्रमातील अंमलदारांना नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या कॉलला प्रतिसाद देण्यापासून नेमून दिलेल्या ठिकाणी पेट्रोलिंग करावी लागणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांचा वापर पोलीस ठाण्याच्या इतर कामासाठी करता येणार नाही. त्यांच्यावर नियंत्रण राहावे म्हणून प्रत्येक दोन तासाला नियंत्रण कक्ष त्यांचे लोकेशन घेणार आहे.

> बीट मार्शल हा उपक्रम अधिक प्रभावीपणे शहरात राबविण्यात यावा म्हणून त्याचे अद्ययावतीकरण करून कॉप्स-24 असे करण्यात येणार आहे. पूर्वीच्या बीट मार्शलमध्ये काही त्रुटी आढळून येत होत्या. त्याच्यावर अभ्यास करून योग्य त्या सूचना या नवीन कॉप्सला देण्यात आल्या आहेत. पोलिसांचा वावर रस्त्यांवर दिसून यावा, रिस्पॉन्स टाईम पाच मिनिटांपर्यंत कमी व्हावा, हा आमचा प्रयत्न असणार आहे. पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविणे हा देखील या मागील दृष्टिकोन आहे.
>
> **- अमितेश कुमार,** पोलीस आयुक्त, पुणे शहर

---

# पायाभूत सुविधांसाठी गडकरींना लिहली १००० पत्रे

## विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांचा देखणा उपक्रम

। चाकण ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**विद्यानिकेतन इंग्लिश मिडीयम स्कूल व विद्या व्हॅली इंटरनॅशनल स्कूल चाकणच्या विद्यार्थ्यांनी पुणे-नाशीक तसेच तळेगाव दाभाडे ते शिक्रापूर महामार्गावरील पायाभूत सुविधा व समस्यांबाबत तक्रारी रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालय विभागाचे केंद्रीय मंत्री ना. नितीन गडकरी यांना पत्र लिहून कळविल्या आहेत. परिसरामध्ये होत असलेल्या गैरसोयींबद्दल तसेच त्यामध्ये येणाऱ्या अडचणी यासंदर्भात विद्यालयातून १००० पत्रे नितीन गडकरी कॅबिनेट मंत्री यांना पाठवण्यात आली.**



सदर विषयाची संकल्पना संस्थेची अध्यक्ष शामराव देशमुख यांची असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाचे प्राचार्य दीपक शिंदे व प्राचार्या स्वाती रणदिवे यांनी या विषयाला विस्तृत स्वरूप देऊन महामार्गावरील तसेच परिसरात होणाऱ्या अनेक समस्यांचे निराकरण होण्यासाठी मंत्री महोदयांना पत्र पाठवले. सदर पत्रांमध्ये परिसरात सातत्याने होणारी वाहतुकीची कोंडी, त्याचबरोबर होणारे अपघात, नगरपरिषद हद्दीमधील तसेच महामार्गांवरील अतिक्रमणे, रस्त्यांचे रखडलेले रुंदीकरण, रस्ते ओलांडताना होणारे अपघात, सुरक्षितता, सार्वजनिक स्वच्छता, आरोग्य, सांस्कृतिक ठेवा, इ. विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले विचार पत्राच्या माध्यमातून व्यक्त केले. त्याचबरोबर विद्यार्थीदशेमध्ये या प्रकारचे अपघात घडल्यावर त्यामधून परिवारातील महत्त्वाचा घटक गमावल्यावर त्या परिवारावर येणारे दुःख दारिद्र्य, क्लेश व संकटे या विषयालाही हात घालण्यात आला. परिसरामध्ये नेहमीच निकृष्ट दर्जाचे रस्ते असल्याकारणाने होणारे अपघात त्याचबरोबर शहरी भागामध्ये स्पीड ब्रेकर, अनधिकृतपणे लावण्यात आलेली वाहने, शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात होणारे ट्रॅफिक जाम, रस्त्यात असणारे खड्डे, नुकताच झालेला भयानक असा कंटेनर अपघात इ. विषयावर विद्यार्थ्यांनी अतिशय मार्मिक शब्दांत आपली मते पत्रांद्वारे व्यक्त केली.

### चाकण टपाल कार्यालयाद्वारे कौतुकोद्गार

विविध प्रांतातील इतर भाषिक विद्यार्थ्यांनी आपापल्या भाषेमध्ये पत्र लिहिली. त्यामध्ये मराठी, हिंदी, तेलगू, कन्नड, मल्याळम, गुजराती, बेंगाली, उडिया व इंग्रजी भाषेतील पत्रांचा समावेश होता. सदर पत्रे विद्यालयाच्यावतीने पोस्ट ऑफिसमध्ये जमा करण्यात आली. सदर नाविन्यपूर्ण उपक्रमाचे परिसरातील सर्व समाज बांधवांकडून कौतुक करण्यात आले. असे नावीन्यक्रम उपक्रम राबवणारी चाकण किंवा पुणे जिल्ह्यातील पहिली शाळा आहे, असे गौरवोद्गार पोस्ट ऑफिसच्या अधिकाऱ्यांकडून काढण्यात आले. त्याचबरोबर अशा प्रकारे अनेक देखणे उपक्रम शाळा आपल्या स्तरावर घेत असते.

## मराठी भाषा संवर्धन पंधरवडा

# विविध उपक्रमांनी साजरा!

### महापालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या मराठी भाषा संवर्धनाचे कार्य करणाऱ्या पिंपरी चिंचवड शहरातील व्यक्तींचा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त प्रजासत्ताक दिनी सन्मान करण्यात आला. पिंपरी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाजवळील मैदानावर हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.**




मराठी भाषेचे संवर्धन व्हावे, मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर व्हावा, या हेतूने दरवर्षी १४ ते २८ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मैत्री पुस्तकांशी, मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करणारे सांस्कृतिक कार्यक्रम, डिजिटल साहित्य संमेलन, मराठी भाषा संवर्धनासाठी उपक्रम राबविणाऱ्या व्यक्तींचा सन्मान असे विविध उपक्रम राबवण्यात आले आहेत.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून महानगरपालिकेने पिंपरी चिंचवड शहरातील सोपान खुडे, सुरेखा कटारिया, नंदकुमार मुरडे, बाळकृष्ण माडगुळकर, संदीप तापकीर, डॉ.धनंजय भिसे, संदीप राक्षे, संजय पवार, अरुण बोऱ्हाडे, देवेंद्र गावडे आदींचा यावेळी सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उप आयुक्त अण्णा बोदडे, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता अनुश्री कुंभार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिव्यांग भवन फाऊंडेशनचे कार्यकारी अधिकारी परेश गांधी, माजी नगरसेवक मारुती भापकर आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड यांनी केले. तर सूत्रसंचालन विकास गायकांबळे यांनी केले.

#### गौरवमूर्तींना दिली भारतीय संविधानाची प्रत

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षपूर्तीनिमित्त तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबवण्यात येत असून मराठी भाषा संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींचा प्रजासत्ताक दिनी सन्मान करताना त्यांना भारतीय संविधानाची प्रत देण्यात आली. याशिवाय भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणादायी संघर्षाची माहिती देणारे 'जग बदलणारा बापमाणूस' हे पुस्तकही यावेळी देण्यात आले.

> महापालिकेच्या वतीने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' साजरा केला जात आहे. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करताना मराठी भाषेतील संवाद अधिक वाढावा तसेच सर्जनशीलतेला वाव मिळावा यासाठी प्रयत्न केला जात आहे. या पंधरवड्यानिमित्त पिंपरी चिंचवड शहरातील मराठी भाषेचा प्रचार प्रसार करत मराठी भाषेच्या संवर्धनाचे काम करणाऱ्या व्यक्तींच्या कार्याचा गौरव केला जात आहे.
>
> **– किरण गायकवाड,**
> विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी , पिंपरी चिंचवड महानगरपालिका

---

## चिखली, मोशी परिसरातील अवैध धंद्यांना आवर घाला

### संजीवन सांगळे : पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांना निवेदन

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिखली, मोशी परिसरामध्ये काही ठिकाणी देह विक्री करणाऱ्या महिला संध्याकाळनंतर रस्त्यावर उभे राहून अश्लील हातवारे करतात. या भागात प्रचंड लोकवस्ती असून, रहदारी देखील मोठ्या प्रमाणात आहे. या प्रकारामुळे या भागातून ये-जा करणाऱ्यांना अनेकदा नाहक मनस्तापाला सामोरे जावे लागत आहे त्यामुळे तातडीने या गोष्टीची दखल घेऊन कारवाई करण्यात यावी अशी मागणी चिखली- मोशी-चऱ्होली- पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्याकडे केली आहे.**


चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हौसिंग सोसायटी फेडरेशन
अध्यक्ष: श्री. संजीवन सांगळे | सचिव: श्री. प्रकाश जुकंटवार
Email ID : cmpcsocietyfederation@gmail.com
दिनांक : 28/1/2025
जावक क्र.: 26/2025

प्रति,
माननीय, पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड शहर,
पिंपरी पुणे 18


विषय - चिखली, मोशी परिसरामध्ये काही ठिकाणी देह विक्री ( वेश्या व्यवसायासाठी ) काही महिला राज रोज पणे रोडवरती उभ्या राहून अनैतिक गोष्टी करत असल्याबाबत असल्याबाबत.

माननीय महोदय,
वरील गंभीर आणि सामाजिक विषयानुसार आपणाला कळविण्यात येते की, चिखली ,मोशी मधील मोशी- आळंदी रोडवरील अक्षा एम्पायर सोसायटी समोर असणाऱ्या पेट्रोल पंपाजवळ, तसेच रिव्हर रेसिडेन्सीच्या ते कोलसिस ग्रीन सोसायटीच्या रोडवरती व या आजूबाजूला मोकळ्या जागेमध्ये रात्रीच्या वेळी काही महिला धंदा विक्रीसाठी उभ्या राहतात. याबाबत आपल्या पोलीस प्रशासनाकडून याकडे डोळेझाक केली जाते. सामाजिक दृष्टिकोनातून या सर्व रोडवरती चालू असणाऱ्या गोष्टीमुळे या भागामध्ये राहणाऱ्या नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे. तरी कृपया आपल्या स्तरावरून या भागातील संबंधित पोलीस स्टेशनला, पोलीस अधिकाऱ्यांना कडक सूचना देऊन या गोष्टी लवकरात लवकर बंद कराव्यात ही विनंती.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
1) माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब मुख्यमंत्री तथा गृहमंत्री महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई 32
2) माननीय आमदार श्री महेशदादा लांडगे, भोसरी विधानसभा

अध्यक्ष
चिखली-मोशी- पिंपरी चिंचवड हाउसींग सोसायटी फेडरेशन मर्या.पुणे

पोलीस आयुक्तांना दिलेल्या निवेदनात अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी म्हटले आहे, मोशी-आळंदी रोडवरील अक्षा एम्पायर सोसायटीसमोर असणाऱ्या पेट्रोल पंपाजवळ, तसेच रिव्हर रेसिडेन्सीच्या ते कोलसिस ग्रीन सोसायटीच्या रोडवरती व या आजूबाजूला मोकळ्या जागेमध्ये रात्रीच्या वेळी काही महिला देह विक्रीसाठी उभ्या राहतात. याबाबत पोलीस प्रशासनाकडून डोळेझाक केली जाते. सामाजिक दृष्टिकोनातून या रस्त्यावर सुरू असलेल्या अनैतिक गोष्टीमुळे या भागामध्ये राहणाऱ्या नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे. त्यामुळे याबाबत तातडीने पावले उचलावी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. फेडरेशनच्या वतीने आमदार महेश लांडगे यांना देखील याबाबत निवेदन देण्यात आले आहे.



> चिखली -मोशी परिसरातील मोशी-देहू रोडवरील अनेक चौकामध्ये सायंकाळपासून ते रात्री बारा वाजेपर्यंत अनेक महिला अशा प्रकारच्या उभ्या राहून देह विक्रीचा व्यवसाय करतात. या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात सोसायट्या आहेत. मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती असताना देखील राजरोजपणे असे धंदे चालत असल्यामुळे या परिसरामध्ये राहणाऱ्या नागरिकांना या गोष्टीचा नाहक मनस्ताप सोसावा लागत आहे. पोलीस प्रशासनाने यावर त्वरित कडक कारवाई करावी .
>
> **- संजीवन सांगळे,**
> अध्यक्ष, चिखली- मोशी-चऱ्होली- पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन.

# शिल्लक गटही फुटला, उबाठाचा बाजार उठला!



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या मूळ

**एक बातमी वाचनात आली आणि क्षणभर धस्स झालं..मुंबईतील शिवसेना उबाठा गटाचे 55 माजी नगरसेवक आणि शेकडो कार्यकर्ते एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत दाखल झाले. उबाठा गटाचे तीन खासदार, पाच आमदार आणि पाच माजी आमदार उद्धव ठाकरेंना सोडण्याच्या तयारीत.. केवढे हे आऊटगोइंग..केवढी ही हतबलता !**

शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर आणि एकनाथ शिंदे चाळीस आमदारांना घेऊन बाहेर पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांची हतबलता सुरू झाली. न्यायालयीन लढ्यात उद्धव ठाकरे यांनी हाराकिरी पत्करली आणि शिवसेना हे पक्षाचे नाव, त्यांचे धनुष्यबाण चिन्ह न्यायालयाने अधिकृतरीत्या एकनाथ शिंदे यांना देऊन टाकले. उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला एक "गट" म्हणून संबोधले जाऊ लागले.

### कुस्ती झेपेना, मस्ती जाईना..

मूळ शिवसेनेची गेले दोन अडीच वर्षे पडझड सुरूच आहे. पण, या गटाचे दोन प्रवक्ते म्हणजे संजय राऊत आणि सुषमा अंधारे यांच्या बोलण्यातील मस्ती आणि मग्रुरी कमी होताना दिसत नाही आणि त्यांना वैतागूनच एक एक नेता त्यांच्या गटाला सोडून जाताना दिसत होता. डोळ्यावर पट्टी ओढून उद्धव ठाकरे हे सर्व हतबलपणे पाहात बसले. त्यांच्या बोलण्यातही कुठे नम्रता दिसली नाही. उलट ते दररोजच अधिक आक्रमकपणे बोलत सुटले.. त्यांचा जणू काही तोलच सुटला !

### समोर दोनच शत्रू.. मिंधे आणि फडतूस

उद्धव ठाकरे यांनी सर्वात मोठा शत्रू ठरवला तो पक्ष फोडणारा एकनाथ शिंदे, ज्यांचा उल्लेख ते सतत मिंधे असा करू लागले. आणि दुसरा शत्रू म्हणजे देवेंद्र फडणवीस. फडणवीस यांच्यासाठी तर त्यांनी अगदी खालच्या पातळीवरील एकही शब्द सोडला नाही. कलंक काय, फडतूस काय, टरबूजा काय.. शेवटी ते या थराला पोहोचले की एक तू तरी राहशील, किंवा मी तरी राहीन ! शेवटी जनतेने फैसला केला आणि फडणवीस यांना प्रचंड बहुमत देऊन मुख्यमंत्रीपदावर बसवले. उबाठा गटाचा सत्यनाश झाला. मुख्य म्हणजे एवढे होऊन देखील या मंडळीचा मस्तवालपणा, मग्रुरी किंवा मस्ती उतरली नाही. रोज कोणता तरी मुद्दा उकरून काढायचा आणि तासनतास तो चघळंत बसायचं ! खरंच वैतागलं हो पब्लिक !! उद्धव ठाकरेंची सभा म्हणजे ठाकरी भाषा, असा भास निर्माण केला जायचा. पण, प्रत्येक सभेमध्ये कोणतीही दूरदृष्टी नाही, विकासाचं नाव नाही..फक्त तेच ते शब्द..खंजीर, कोथळा, गद्दार, छाताड, ओके ! अडीच तीन वर्षे जनता हेच बघत आणि ऐकल्यामुळे शेवटी जनतेनेच त्यांना जागा दाखवली आणि त्यांचा गट जवळ जवळ भुईसपाट केला.

### उद्धव ठाकरेंच्या बरोबर कोण ?

विधानसभा निवडणुकीत सुपडा साफ झाल्यानंतर उद्धव ठाकरे सावरण्याची काहीतरी रणनीती आखतील, असे वाटले होते, पण फुस्स! आणि भवितव्यच दिसत नसल्यामुळे आता रोज त्यांच्या गटातील जथ्थेच्या जथ्थे एकनाथ शिंदे किंवा भारतीय जनता पार्टीत प्रवेश करू लागले आहेत. हे सर्व काही घडत आहे, ते मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, हे लक्षात घ्यायला हवे !

### लोकसभा निवडणुकीत यश, पण..

गेल्या सहा महिन्यातला थोडा इतिहास पाहा. लोकसभा निवडणुकीत चांगले यश मिळाल्यानंतर आत्मविश्वास बळावलेल्या ठाकरे गटाला विधानसभा निवडणुकीत चांगलाच दणका बसला. एकनाथ शिंदे गटाने ठाकरे गटाच्या तुलनेत जवळपास तिप्पट आमदार निवडून आणत खरी शिवसेना आपलीच असल्याचा दावा मजबूत केला. शिंदेंच्या बंडानंतर आमदार, खासदारांसह सत्तादेखील गमावलेल्या ठाकरे गटासाठी लोकसभा निवडणूक तात्पुरती का होईना समाधान देणारी ठरली. किती आमदार, खासदार आपल्या सोबत आहेत, यापेक्षा उद्धव ठाकरेंना सत्ता आपल्या हाती नाही, ही बाब अधिक चिंतेत टाकणारी आहे. त्यात आता रोजच आउटगोईंगला सुरुवात झाली आहे.

### सत्ता असेल तर सर्वकाही..

हातामध्ये सत्ता असली की कार्यकर्ते जोडून ठेवता येतात आणि अलीकडील काळात तर आमदार, खासदारांनाही जोडून ठेवण्यासाठी सत्ता असणे आवश्यक ठरले आहे. याच गोष्टीमुळे केंद्रात आणि राज्यातही सत्तेत असलेला एकनाथ शिंदे गट सध्या उद्धव ठाकरे गटावर भारी पडत असल्याचे दिसते. त्यामुळेच आपल्या हाती असलेला सत्तेचा शेवटचा बुरुज म्हणजे मुंबई महानगरपालिका आपल्याकडे कायम ठेवण्यासाठी उद्धव ठाकरे जीवाचे रान करणार यात शंका नाही. पण, ठाकरे यांचे हे जहाज बुडणारे असल्यामुळे त्या जहाजातून उड्या मारण्याचे तंत्र युद्ध पातळीवर सुरू झाले आहे.

### कोकणातील पाया ढासळला

कोकणातील उद्धव ठाकरे गटाचा पाया वेगाने ढासळत आहे. ठाण्याचे ठाणेदार तर एकनाथ शिंदेच आहेत आणि उर्वरित महाराष्ट्रातही उद्धव ठाकरे गटाकडे फारशी ताकद नाही. त्या परिस्थितीत पक्षाचे अस्तित्व सक्षमपणे टिकवून ठेवायचे असेल तर मुंबई हा आपला अखेरचा गड कोणत्याही परिस्थितीत ठाकरे गटाला शाबूत राखावाच लागेल. मध्यंतरी संजय राऊत यांनी ठाकरे गट स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका स्वबळावर लढणार असल्याचे घोषित केले होते; परंतु, उद्धव ठाकरेंनी अजूनही अधिकृतपणे त्यासंदर्भात बोलण्याचे टाळले आहे. स्वबळाची घोषणा करण्यापूर्वी आपले स्वबळ नेमके किती शिल्लक आहे, याची खातरजमा त्यांना करायची असेल. परंतु, आघाडीतून लढायचे तर सध्या सुरू असलेली गळती अधिक वेगाने होऊन काही वॉर्डात उमेदवार औषधालाही सापडणार नाही, अशी परिस्थिती निर्माण होण्याची भीती आहे.

एकीकडे उद्धव ठाकरे शिंदे यांच्यावर सूड उगवण्याची भाषा करीत असले, तरी आपली ताकद घटल्याची जाणीव त्यांना आहे. त्यामुळेच शिवसैनिकांची लढण्याची तयारी असेल, सूड उगवण्याइतपत त्वेष त्यांच्यात असेल, तर स्वबळावर लढण्यास तयार असल्याचे संकेत त्यांनी दिले आहेत. अर्थात स्वबळावर लढायचे म्हणजे काँग्रेस, शरद पवार गट, समाजवादी पक्ष आणि सध्याच्या इतर समर्थक गटांचा विरोध पत्करावा लागेल आणि या सगळ्याच पक्षांचे उमेदवार शेवटी ठाकरे गटाचीच मते खाणार आहेत. त्यात समोरच्या बाजूला भाजप, शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अजितदादा गट आणि राज ठाकरे यांची युती झाल्यास ही निवडणूक किमान मुंबईपुरती तरी ठाकरे गटाला खूपच जड जाऊ शकते, त्यांचा शेवटचा बुरुजही ढासळू शकतो !

मुंबई महानगरपालिका जिंकल्यास ठाकरे गटाला ताकद मिळेलः परंतु सध्या तरी उद्धव ठाकरेंची द्विधा मनःस्थिती झालेली आहे. स्वबळ की स्वतंत्र या दोन पेचात ते अडकले आहेत. पण परिस्थिती पाहता कोणताही निर्णय घेतला तरी 'तेल गेलं, तूप गेलं, हाती धुपाटणं राहिलं' अशी त्यांची दुर्दैवाने अवस्था आहे.

आगामी महानगरपालिका निवडणुकीत मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आदी महानगरपालिकांमधून ठाकरे गटाला संपविणे, हे शिंदे यांचे उद्दिष्ट आहे, यामुळेच मुख्यमंत्रिपद न मिळाल्याचे दुःख विसरून शिंदे यांना भाजपाच्या मागे सारी ताकद उभी करावी लागणार आहे. सूड उगवण्याचे ठाकरे यांनी जाहीर केल्यामुळे आता शिंदेसाठीही या निवडणुका प्रतिष्ठेच्या झाल्या आहेत, हे मान्य करावेच लागेल. थोडक्यात काय, उबाठा गटाची शेवटची फडफड सुरू आहे. एकीकडे भाजपा बलशाही होत चालला आहे, त्यांना एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार यांची मोठी ताकद मिळत आहे, त्यामुळे त्या ताकदीपुढे उद्धव ठाकरे यांचा गट नामशेष होतो की काय, अशी शंका येऊ लागली आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या शब्दात सांगायचे झाले तर, काँग्रेसच्या मार्गाने जाणाऱ्या या उबाठा गटाचे दुकान मतदारांनीच बंद करायचे ठरवले आहे की काय?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील)
विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# म्हणून खासदारकीची ऑफर दिली!

## ठाकरे गटाच्या नेत्याबाबत शिंदे गटाच्या नेत्याचं मोठं विधान



**। मुंबई ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज (२८ जानेवारी) एक मोठा गौप्यस्फोट केला. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. "शिंदेंच्या शिवसेनेकडून खासदारकीची ऑफर आली होती तसेच भारतीय जनता पार्टीकडून राज्यपाल पदाची ऑफर आली होती", असा गौप्यस्फोट चंद्रकांत खैरे यांनी केला. त्यांच्या या विधानानंतर आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. लोकसभेच्या निवडणुकीवेळी चंद्रकांत खैरे यांना खासदारकीची ऑफर दिली होती, कारण आम्हाला आमचा पक्ष वाढवायचा होता असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे.**

"नक्कीच, तेव्हा लोकसभेची निवडणूक होती आणि चंद्रकांत खैरे त्या अर्थाने जेष्ठ नेते आहेत. माझा पक्ष मला वाढवायचा होता. त्यामुळे माझं काम होतं त्यांना ऑफर देणं. चंद्रकांत खैरे यांनी आज आमच्याकडून लोकसभेची निवडणूक लढवली असती तर ते आज खासदार देखील झाले असते. मात्र, त्यावेळी त्यांनी आमची ऑफर नाकारली, परिणाम असा झाला की त्यांच्याच विरोधात आम्हाला लोकसभेची निवडणूक लढवावी लागली. आमचे संदिपान भुमरे हे लोकसभा लढले आणि निवडून देखील आले", असं संजय शिरसाट यांनी टिव्ही ९ मराठी या वृत्तवाहिनीशी बोलताना म्हटलं आहे."मला अनेकवेळा ऑफर आल्या आहेत. लोकसभा निवडणुकीच्या आधीपासून मला अनेक मोठमोठ्या नेत्यांकडून ऑफर आल्या. मात्र, मी त्यांना सांगितलं की बाळासाहेब ठाकरे यांचा कडवट शिवसैनिक आहे आणि त्या विश्वासाला मी तडा जाऊ देणार नाही. मी उद्धव ठाकरे यांच्याच नेतृत्वात काम करणार आहे. मला शिंदेंच्या शिवसेनेकडून लोकसभा निवडणुकीच्या आधी ऑफर होती. कारण त्यांना छत्रपती संभाजीनगरमध्ये उमेदवार मिळत नव्हता. संजय शिरसाट यांनी दोन-तीन लोकांकडे सांगितलं होतं की त्यांना म्हणजे मला घेऊन या आम्ही सर्व खर्च करू वैगेरे, पण मी त्यांना नकार दिला", असा गौप्यस्फोट चंद्रकांत खैरे यांनी आज केला होता.भारतीय जनता पक्षाकडून मला खूप वेळा ऑफर आली. भाजपाचे काही नेते माझ्याकडे अनेकदा येऊन गेले. यामध्ये महाराष्ट्रातील काही नेते होते. मात्र, माझा संपर्क अनेक वर्षांपासून दिल्लीतील नेत्यांबरोबर देखील आहे. त्यामुळे मला दिल्लीमधूनही ऑफर आली होती. अनेक मान्यवरांनी मला सांगितलं की तुम्ही आमच्याकडे येऊन जा. आम्ही तुम्हाला राज्यसभेची खासदारकी आणि मंत्री करतो. त्यानंतर काही दिवसांपूर्वी हरिभाऊ बागडे राज्यपाल झाले, तेव्हा मलाही सांगितलं की तुम्हाला राज्यपाल करू अशी ऑफर दिली होती. मात्र, मी त्यांना नकार दिला", असंही चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं होतं.शिवसेना ठाकरे गटाचे नेते तथा छत्रपती संभाजीनगरचे माजी खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज (२८ जानेवारी) एक मोठा गौप्यस्फोट केला. त्यांच्या या विधानानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. "शिंदेंच्या शिवसेनेकडून खासदारकीची ऑफर आली होती तसेच भारतीय जनता पार्टीकडून राज्यपाल पदाची ऑफर आली होती", असा गौप्यस्फोट चंद्रकांत खैरे यांनी केला. त्यांच्या या विधानानंतर आता शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री संजय शिरसाट याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे. लोकसभेच्या निवडणुकीवेळी चंद्रकांत खैरे यांना खासदारकीची ऑफर दिली होती, कारण आम्हाला आमचा पक्ष वाढवायचा होता असं संजय शिरसाट यांनी म्हटलं आहे. "नक्कीच, तेव्हा लोकसभेची निवडणूक होती आणि चंद्रकांत खैरे त्या अर्थाने जेष्ठ नेते आहेत. माझा पक्ष मला वाढवायचा होता. त्यामुळे माझं काम होतं त्यांना ऑफर देणं.

### तुम्ही आमच्याकडे येऊन जा

चंद्रकांत खैरे यांनी आज आमच्याकडून लोकसभेची निवडणूक लढवली असती तर ते आज खासदार देखील झाले असते. मात्र, त्यावेळी त्यांनी आमची ऑफर नाकारली, परिणाम असा झाला की त्यांच्याच विरोधात आम्हाला लोकसभेची निवडणूक लढवावी लागली. मी उद्धव ठाकरे यांच्याच नेतृत्वात काम करणार आहे. मला शिंदेंच्या शिवसेनेकडून लोकसभा निवडणुकीच्या आधी ऑफर होती. कारण त्यांना छत्रपती संभाजीनगरमध्ये उमेदवार मिळत नव्हता. संजय शिरसाट यांनी दोन-तीन लोकांकडे सांगितलं होतं की त्यांना म्हणजे मला घेऊन या आम्ही सर्व खर्च करू वैगेरे, पण मी त्यांना नकार दिला", असा गौप्यस्फोट चंद्रकांत खैरे यांनी आज केला होता. भारतीय जनता पक्षाकडून मला खूप वेळा ऑफर आली. भाजपाचे काही नेते माझ्याकडे अनेकदा येऊन गेले. यामध्ये महाराष्ट्रातील काही नेते होते. मात्र, माझा संपर्क अनेक वर्षांपासून दिल्लीतील नेत्यांबरोबर देखील आहे. त्यामुळे मला दिल्लीमधूनही ऑफर आली होती. अनेक मान्यवरांनी मला सांगितलं की तुम्ही आमच्याकडे येऊन जा. आम्ही तुम्हाला राज्यसभेची खासदारकी आणि मंत्री करतो.

---

# धसांना काय वाटतं याच्याशी देणंघेणं नाही

## अंजली दमानिया यांनी मला काही कागदपत्र दिले : अजित पवार

**। कोल्हापूर ।**
**प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर राज्यभरात खळबळ उडाली होती. या घटनेनंतर आरोपींना पोलिसांनी अटक केलं. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी तपास यंत्रणांकडून सुरु आहे. तसेच खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराड याचाही सहभाग संतोष देशमुख हत्या प्रकरणात असल्याचा आरोप विरोधक करत आहेत.**

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली होती. त्या भेटीत मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी त्यांनी केली होती.तसेच काही कागदपत्रही त्यांनी अजित पवार यांना दिली होती. यानंतर अजित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत काय चर्चा झाली? याविषयीची माहिती अजित पवार यांनी सांगितली. तसेच सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात जो कोणी दोषी असेल त्याच्यावर कारवाई केली जाईल, असंही अजित पवार यांनी स्पष्ट केलं. तसेच भाजपाचे



आमदार सुरेश धस यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यासंदर्भात देवेंद्र फडणवीस नाही तर अजित पवार निर्णय घेतील असं म्हटलं होतं. यावरून अजित पवार यांनी प्रत्युत्तर देत सुरेश धस यांना काय वाटतं त्याच्याशी मला काही घेणं देणं नाही, असं म्हणत खोचक टीका केली आहे.अंजली दमानिया यांनी मला काल काही कागदपत्र दिले. ते कागदपत्र मी पाहिले आहेत. आज मंत्रिमंडळाची बैठक झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबरोबर मी चर्चा केली. यावेळी त्यांनी मला सांगितलं की तुम्हाला अंजली दमानिया भेटल्या, तसं त्यांनी माझीही भेट घेतली. अंजली दमानिया यांनी फडणवीसांनाही काही कागदपत्र दिले आहेत. मी फडणवीस यांना विचारलं की तुम्ही काय केलं?

### त्याच्याशी मला काहीही देणंघेणं नाही

सुरेश धस यांनी म्हटलं होतं की धनंजय मुंडे यांचा राजीनामा मुख्यमंत्री फडणवीस यांनी नाही तर अजित पवार यांनी घ्यावा, याबाबत अजित पवार यांना प्रश्न विचारण्यात आला असता ते म्हणाले, "सुरेश धस यांना काय वाटतं? त्याच्याशी मला काहीही देणंघेणं नाही. त्यामुळे मी भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांबरोबर चर्चा करत असतो. त्यांच्याशी चर्चा करून महायुतीचं सरकार पुढे चालावं त्यासाठी आम्ही प्रमुख निर्णय घेत असतो. मात्र, असं वेगवेगळ्या पक्षातले खालचे कार्यकर्ते बोलायला लागले तर त्याला काही अर्थ राहणार नाही. भाजपाची जी काही भूमिका असेल ती भूमिका आम्हाला अमित शाह किंवा देवेंद्र फडणवीस हे सांगतील", असं अजित पवार यांनी म्हटलं आहे.

# उत्तर प्रदेशातील बागपतमध्ये मोठी दुर्घटना!

## धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून 7 जण ठार, 40 जखमी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**उत्तर प्रदेशमधील बागपतमध्ये आज (२८ जानेवारी) एक मोठी दुर्घटना घडली आहे. बागपतमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ जण ठार झाले आहेत, तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. तसेच ५० पेक्षा जास्त भाविक स्टेजखाली दबल्याची भीती व्यक्त केली जात आहे. या घटनेनंतर या ठिकाणी चेंगराचेंगरी सदृष्य परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेत जखमी झालेल्या भाविकांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.**



बागपत येथे मंगळवारी जैन निर्वाण उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. यावेळी भगवान आदिनाथांच्या निर्वाण लाडू उत्सवात मनस्तंभ संकुलात तात्पुरतं उभारलेलं लाकडी व्यासपीठ अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले. या अचानक घडलेल्या दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भगवान आदिनाथांना लाडू अर्पण करण्यासाठी आज सकाळी शेकडो भाविक या ठिकाणी आले होते. मात्र, अचानक ही दुर्घटना घडली. ही घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केलं. त्यानंतर जखमी झालेल्या भाविकांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच या घटनेची माहिती मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली असून योग्य त्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी अस्मिता लाल यांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, “बागपतमध्ये हा कार्यक्रम सुमारे ३० वर्षांपासून आयोजित केला जातो. यावेळीही आयोजित करण्यात आला होता. मात्र, अचानक लाकडी व्यासपीठ कोसळल्याने ही घटना घडली. यामध्ये ४० लोक जखमी झाले आहेत. त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच २० जणांना प्राथमिक उपचार दिल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आलं आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. तसेच त्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आलेला आहे. तसेच रुग्णवाहिका आणि तातडीने उपचारासाठी आरोग्य व्यवस्था देखील उपलब्ध करण्यात आली आहे”, असं अस्मिता लाल यांनी सांगितलं आहे.बागपत येथे मंगळवारी जैन निर्वाण उत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या उत्सवासाठी मोठ्या प्रमाणात भाविक दाखल झाले होते. यावेळी भगवान आदिनाथांच्या निर्वाण लाडू उत्सवात मनस्तंभ संकुलात तात्पुरतं उभारलेलं लाकडी व्यासपीठ अचानक कोसळल्याने मोठी दुर्घटना घडली. या दुर्घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले. या अचानक घडलेल्या दुर्घटनेनंतर त्या ठिकाणी मोठा गोंधळ उडाला होता. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भगवान आदिनाथांना लाडू अर्पण करण्यासाठी आज सकाळी शेकडो भाविक या ठिकाणी आले होते. मात्र, अचानक ही दुर्घटना घडली. ही घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केलं. त्यानंतर जखमी झालेल्या भाविकांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच या घटनेची माहिती मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घेतली असून योग्य त्या सूचना त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

जिल्हाधिकारी अस्मिता लाल यांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, “बागपतमध्ये हा कार्यक्रम सुमारे ३० वर्षांपासून आयोजित केला जातो. यावेळीही आयोजित करण्यात आला होता.

### 40 पेक्षा जास्त जण जखमी झाले

मात्र, अचानक लाकडी व्यासपीठ कोसळल्याने ही घटना घडली. आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. तसेच २० जणांना प्राथमिक उपचार दिल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात आलं आहे. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. तसेच त्या ठिकाणी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसह मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आलेला आहे. तसेच रुग्णवाहिका आणि तातडीने उपचारासाठी आरोग्य व्यवस्था देखील उपलब्ध करण्यात आली आहे”, असं अस्मिता लाल यांनी सांगितलं आहे..पोलीस अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भगवान आदिनाथांना लाडू अर्पण करण्यासाठी आज सकाळी शेकडो भाविक या ठिकाणी आले होते. मात्र, अचानक ही दुर्घटना घडली. ही घटना घडल्यानंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केलं. त्यानंतर जखमी झालेल्या भाविकांना तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. उत्तर प्रदेशमधील बागपतमध्ये आज (२८ जानेवारी) एक मोठी दुर्घटना घडली आहे. बागपतमध्ये एका धार्मिक कार्यक्रमात स्टेज कोसळून झालेल्या दुर्घटनेत ७ जण ठार झाले आहेत, तर ४० पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत.

# आप हा पक्ष भ्रष्टाचाराच प्रतीक

## आपने बांगलादेशी घुसखोर, रोहिंग्यांना दिले बनावट आधार कार्ड

। प्रयागराज ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली विधानसभेची निवडणूक पुढच्या महिन्यात पार पडते आहे. प्रचाराची रणधुमाळी पेटली आहे. दरम्यान उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी एका सभेला संबोधित करताना दिल्लीत सत्ताधारी असलेली आम आदमी पार्टी म्हणजे भ्रष्टाचाराचं प्रतीक आहे असा आरोप केला आहे. तसंच बांगलादेशी आणि रोहिंग्यांना बनावट आधार आपने बनवून दिले असाही आरोप त्यांनी केला आहे.**

दिल्लीतल्या आपच्या सरकारने बांगलादेशी घुसखोर आणि रोहिंग्यांना बनावट आधार कार्ड तयार करुन दिले आहेत. त्यांना दिल्लीत स्थायिक करता यावं म्हणून आम आदमी पार्टीने हे पाप केलं आहे. अरविंद केजरीवाल हे आप पक्षाचे संस्थापक आहेत त्यांच्या नेतृत्वात हा पक्ष घुसखोरांचं लांगुलचालन करतो आहे. या पक्षाला निवडून देण्यापेक्षा भाजपाचा पर्याय निवडला पाहिजे असं आवाहन योगी आदित्यनाथ यांनी केलं आहे.योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, आप हा पक्ष भ्रष्टाचार आणि अराजक यांचं प्रतीक आहे. अरविंद केजरीवाल यांच्याकडे दिल्लीचा चेहरा बदलण्याची,



विकास करण्याची संधी होती. मात्र त्यांनी त्याचा उपयोग केला नाही. आता भाजपाच्या डबल इंजिन सरकारला निवडा म्हणजे दिल्लीचा विकास होईल असंही योगी आदित्यनाथ म्हणाले आहेत.योगी आदित्यनाथ म्हणाले, दिल्लीतल्या आपच्या सरकारने दिल्ली मेरठ द्रुतगती महामार्ग आणि दिल्ली ते मेरठ रॅपिड रेल्वे प्रकल्प या दोन प्रकल्पांना सहकार्य करण्यास नकार दिला.दिल्लीतले लोक आता चांगल्या पायाभूत सुविधांसाठी दिल्ली सोडून गाझियाबाद आणि नोएडा या ठिकाणी जात आहेत असाही आरोप योगी आदित्यनाथ यांनी केला. आप आणि काँग्रेस या पक्षाचे लोक वक्फ बोर्डाला प्रोत्साहन देत आहेत. वक्फ माफियांवर आम्ही चाप लावत आहोत हे यांना नको आहे. जिकडे रुमाल ठेवाल ती वक्फची मालमत्ता हे धोरण भाजपा चालू देणार नाही. त्यामुळेच आता आपला आणि काँग्रेसला या लोकांपुढे कसं संकट निर्माण झालं आहे .

### म्हणाले योगी आदित्यनाथ?

चिंता आहे असाही टोला योगी आदित्यनाथ यांनी लगावला. दिल्लीतल्या यमुना नदीच्या प्रदुषणावरुनही योगी आदित्यनाथ यांनी अरविंद केजरीवाल यांच्यावर टीका केली. दिल्लीतल्या सत्ताधाऱ्यांमध्ये थोडीशी जरी नैतिकता असती तर त्यांनी सरकारमधल्या मंत्र्यांसह यमुनेत डुबकी मारली असती. असा टोला योगी आदित्यनाथ यांनी लगावला. तसंच नाव न घेता यमुना नदीच्या प्रदुषणावरुन अरविंद केजरीवाल आणि आपवर टीका केली.

# अधिपतीचा मोठा गैरसमज!

'तुला शिकवीन चांगलाच धडा' या मालिकेत गेल्या काही दिवसांपासून अक्षरा आणि अधिपती यांच्यात दुरावा आल्याचा सीक्वेन्स चालू आहे. दोघंही मकरसंक्रांतीच्या शुभमुहूर्तावर एकमेकांना भेटण्याचा निर्णय घेतात. पण, ऐनवेळी भुवनेश्वरी अक्षराची बहीण इराला हाताशी घेऊन या दोघांमध्ये गैरसमज निर्माण करणार आहे. अधिपती अक्षराला भेटण्यासाठी तिच्या माहेरी जातो. तर, मास्तरीण बाई आपल्या वडिलांसह सासरी येते. नेमकी याचवेळी दोघांची चुकामूक होते. अधिपती घरी नसल्याने अक्षरा आणि तिच्या वडिलांना सूर्यवंशींच्या घरी अपमान सहन करावा लागतो. पण, अक्षरा यावेळी सासूचा एकही शब्द ऐकून न घेता तिला प्रतिउत्तर देते. अक्षरा आणि भुवनेश्वरी यांच्यात या दरम्यान मोठा वाद होतो. तर, दुसरीकडे इरा आपल्या स्वत:च्याच बहिणीविरोधात अधिपतीचे कान भरते.'ताईचा मित्र परदेशातून आल्यापासून ती खूप आनंदी आहे' असा निरोप ती अधिपतीला देते. आता या विदेशातून आलेल्या अक्षराच्या 'मॅड' मित्राची भूमिका मालिकेत तेजस बर्वे साकारणार आहे.



# दंगल, जाळपोळ अन् मनात प्रेमाचं वादळ

'रांझणा' चित्रपटाच्या यशानंतर दिग्दर्शक आनंद एल रॉय आणि अभिनेता धनुष यांची जोडी आणखी एक रोमँटीक ड्रामा 'तेरे इश्क मे' चित्रपट घेऊन येत आहे. या चित्रपटात धनुषबरोबर मुख्य भूमिकेत अभिनेत्री क्रिती सेननसुद्धा दिसणार आहे. नुकताच क्रितीचा या चित्रपटातील पहिला व्हिडीओ समोर आला आहे. हा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे.जिथे प्रेमासाठी मनात उत्कंटता असते तिथे कथा वेगळी असते", अशा कॅप्शनसह व्हिडीओ पोस्ट करण्यात आला आहे. व्हिडीओमध्ये सुरुवातीलाच जाळपोळ आणि दंगल सुरू असल्याचं दिसत आहे. अनेक व्यक्ती हातात लाठ्या काठ्या घेऊन एकमेकांवर धावून येत आहेत. तसेच क्रिती हातात रॉकेल घेऊन या दंगलमधून वाट काढत पुढे चालली आहे.व्हिडीओमध्ये पुढे "तुझं माझ्यावर प्रेम आहे हे मला माहिती आहे. मात्र, हे प्रेम माझ्याही मनात असावं हे गरजेचं तर नाही.
तू रागात संपूर्ण शहर डोक्यावर घेतलंस तरी त्याचं दु:ख मलाही व्हावं हे गरजेचं नाही. डायलॉग संपताच क्रिती हातातला रॉकेलचा डब्बा तिच्या डोक्यावर आणि अंगावर ओतून घेते. तसेच एका ठिकाणी बसते आणि ओठांमध्ये सिगरेट पकडते. 'तेरे इश्क मे' या चित्रपटात क्रिती मुक्ती हे पात्र साकारणार आहे.


# खरंच हे खूप धमाल आहे !

अभिनेत्री श्रद्धा कपूरसाठी २०२४ हे वर्ष खूप खास ठरले. याच वर्षी तिच्या 'स्त्री २' या सिनेमाने बॉक्सऑफिसवर रेकॉर्डब्रेक कमाई केली. याचवर्षी तिने तिचा बॉयफ्रेंड राहुल मोदीबरोबरच्या ब्रेकअपच्या बातम्यांना खोट ठरवत त्याच्याबरोबरच्या डेटिंगचे फोटो पोस्ट केले होते. यामुळे गेले वर्ष तिचे व्यावसायिक आणि व्यक्तिगत आयुष्यात खास ठरले. श्रद्धा यशाचे शिखर गाठत असले तरी ती आजही तिच्या कुटुंबीयांबरोबरच राहते. 'स्क्रीन'च्या लॉन्च इव्हेंटदरम्यान श्रद्धाने तिच्या घरातील जवळच्या व्यक्तींबद्दल व्यक्त झाली. स्क्रीनच्या व्यासपीठावर श्रद्धा म्हणाली, "मी अजूनही माझ्या आई-वडिलांबरोबर आणि माझ्या पाळीव प्राण्यांसह राहते, आणि खरंच हे खूप धमाल आहे," कपूर कुटुंबाबद्दल अधिक बोलताना श्रद्धा म्हणाली, "माझ्या आई-वडिलांनी माझं यश-अपयश दोन्ही पाहिलं आहे. त्यांनी मला एक अप्रतिम सपोर्ट सिस्टीम दिल्याबद्दल मी कृतज्ञ आहे.श्रद्धाने पुढे तिच्या घरी असलेल्या नियमांबद्दल सांगितले. ती म्हणाली, "आमच्या घरी एक नियम आहे.



# अंडरवर्ल्डमधून यायचे धमक्यांचे फोन

बॉलीवूड व अंडरवर्ल्डच्या संबंधाबाबत अनेकदा बोलले जाते. प्रसिद्ध दिग्दर्शक राकेश रोशन(RAKESH ROSHAN) यांच्यावर एकदा गोळीबार झाला होता. त्याच्या संबंध अंडरवर्ल्डशी असल्याचे त्यांनी अनेक मुलाखतींमध्ये सांगितले आहे. आता द रोशन्स या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या डॉक्युमेंटरीमध्येदेखील त्यांनी या प्रसंगाचा उल्लेख केला आहे. हृतिक रोशनचा पहिला चित्रपट 'कहो ना प्यार है' हा चांगलाच गाजला होता. पण, हा चित्रपट प्रदर्शित झाल्याच्या एक आठवड्यानंतर चित्रपटाचे निर्माते व हृतिक रोशनचे वडील राकेश रोशन यांच्यावर त्यांच्या मुंबईतील ऑफिसबाहेर गोळीबार करण्यात आला होता. हा हल्ला अंडरवर्ल्डमधील काही लोकांनी केला होता. या हल्ल्यापूर्वी राकेश रोशन यांना त्यांच्याकडून धमक्या देण्यात आल्या होत्या.काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत राकेश रोशन यांनी या घटनेबद्दल वक्तव्य केले होते. जेव्हा त्यांच्यावर गोळीबार झाला, तेव्हा त्यांना धक्का बसला होता आणि बराच वेळ गोळी लागल्याची जाणीव झाली नव्हती, असे म्हटले होते.'झूम'शी बोलताना राकेश रोशन यांनी म्हटलेले की गोळीबाराच्या घटनेनंतर ड्रायव्हर हा भीतीने थरथरत होता, त्यामुळे आम्ही लगेचच घटनास्थळावरून बाजूला गेलो आणि एका गल्लीत गाडी थांबवली. मी माझ्या ड्रायव्हरला शांत व्हायला सांगितले. तोपर्यंत मला गोळी लागल्याचेही लक्षात आले नव्हते. त्यानंतर आम्ही पोलिस स्टेशनकडे निघालो. कारण- गोळीबार करणारे जवळच असतील अशी मला शंका होती. त्यामुळे त्यांना पकडले जाऊ शकते, असे वाटले.याबद्दल अधिक बोलताना राकेश रोशन यांनी म्हटलेले की तोपर्यंत मला माझा शर्ट थोडासा ओला झाल्याचे जाणवले. पुढच्या काही क्षणातच लक्षात आले की रक्त येत आहे.



# उर्वशी रौतेलाने ट्रोल करणाऱ्यांना दिलं उत्तर

बॉलीवूड अभिनेता सैफ अली खानवर काही दिवसांपूर्वी मोठा हल्ला झाला. चोराने सैफच्या राहत्या घरात घुसून त्याच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात सैफ गंभीर जखमी झाला होता. त्याच्यावर अशा पद्धतीने हल्ला झाल्यावर मनोरंजन विश्वातील अनेक कलाकारांनी आपली प्रतिक्रिया दिली होती. तसेच सैफबद्दल काळजी व्यक्त करत सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. अभिनेत्री उर्वशी रौतेलानेदेखील यावर तिची प्रतिक्रिया दिली होती.मात्र, तिने दिलेली प्रतिक्रिया नेटकऱ्यांना काहीशी खटकली आणि सोशल मीडियावर तिला ट्रोल करण्यास सुरुवात झाली. सध्या उर्वशीला अनेक नेटकरी 'ब्यूटी विदाउट ब्रेन' म्हणून ट्रोल करत आहेत. ट्रोलर्सच्या निशाण्यावर असताना आता अभिनेत्रीने स्वत: यावर आपलं उत्तर दिलं आहे. उर्वशीने नुकतीच 'इन्स्टंट बॉलीवूड'ला मुलाखत दिली. यावेळी तिने ट्रोलर्सला तिच्या अंदाजात उत्तर दिलं आहे.उर्वशीला विचारण्यात आलं की, "तुला सध्या 'ब्यूटी विदाउट ब्रेन' म्हणून ट्रोल करत आहेत." त्यावर उत्तर देत ती म्हणाली, "लोकं असे आहेत की, आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावरदेखील टीका करतात. इतकंच नाही तर माझे आवडते कलाकार सलमान खान आणि शाहरूख खान अशा मोठ्या व्यक्तींनासुद्धा लोक सोडत नाहीत; तर आता तुम्हीच सांगा यावर काय करावे."सैफवर झालेल्या हल्ल्यावर उर्वशीने माध्यमांना प्रतिक्रिया दिली होती. तिने तिचं महागडं घड्याळ दाखवल्यावरून तिला ट्रोल केलं जात आहे. त्यावेळी तिने 'एएनआय'ला मुलाखत दिली होती. त्यात ती म्हणाली होती की, "घडलेली घटना अत्यंत वाईट आहे. एकतर 'डाकू महाराज' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर १०५ कोटींचा आकडा पार केला आहे. तसेच माझ्या आईने नुकतेच मला हिऱ्यांनी जडलेलं रॉलेक्स घड्याळ गिफ्ट म्हणून दिलं आहे. माझ्या वडिलांनीसुद्धा मला महागडी वस्तू गिफ्ट म्हणून दिलेली आहे. त्यात सध्या अशा घटना घडत असल्याने इतक्या महागड्या वस्तूंसह आम्ही मोकळेपणाने बाहेर फिरणार कसे?"उर्वशीने दिलेल्या याच प्रतिक्रियेने नेटकऱ्यांनी तिच्यावर जोरदार टीका केली. तसेच अनेक जण तिला 'ब्यूटी विदाउट ब्रेन' असं म्हणू लागले आहेत. उर्वशीने यावर दिलेल्या उत्तरात तिने थेट सलान खान आणि शाहरूख खानचं नाव घेतल्याने आता यावरूनही तिला ट्रोल केलं जात आहे. उर्वशी रौतेला नुकतीच 'डाकू महाराज' या चित्रपटात झळकली. हा एक तेलगू चित्रपट असून बॉक्स ऑफिसवर जोरदार कमाई करताना दिसत आहे.

# इंडियाची विजयाची हॅट्ट्रिक हुकली!

## इंग्लंडचं पुनरागमन; जोस बटलरची ऐतिहासिक कामगिरी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारत-इंग्लंड तिसऱ्या टी-२० सामन्यात इंग्लंडने भारताला विजयासाठी १७२ धावांचे लक्ष्य दिले आहे. या संपूर्ण मालिकेत इंग्लंडकडून जोस बटलरने उत्कृष्ट कामगिरी करत संघासाठी धावा केल्या आहेत. यासह आता तिसऱ्या टी-२० मध्ये बटलरने नवा विक्रम आपल्या नावे केला. त्याने अवघ्या १८ धावा करत एक मोठा विक्रम आपल्या नावावर केला. जोस बटलरने भारताविरुद्धच्या तिसऱ्या टी-२० सामन्यात १८ धावा पूर्ण करताच त्याने एक मोठा विक्रम रचला. बटलर तिसऱ्या टी-२० सामन्यात अवघ्या २४ धावा करत बाद झाला पण त्याने विक्रम मात्र त्याने आपल्या नावे केला आहे.**




त्याने अफगाणिस्तानच्या मोहम्मद नबीला मागे टाकले, ज्याने २५ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये ५५६ धावा केल्या. आता जोस बटलर हा टी-२० मध्ये भारतात सर्वाधिक धावा करणारा विदेशी फलंदाज बनला आहे. त्याने २०व्या टी-२० सामन्यात ५५७* धावा केल्या आहेत. या प्रकरणात, दक्षिण आफ्रिकेचा क्विंटन डी कॉक तिसऱ्या स्थानावर आहे, ज्याने १२ टी-२० सामन्यांमध्ये ४५८ धावा केल्या आहेत.

ग्लेन मॅक्सवेल ४४५ धावांसह चौथ्या आणि मोहम्मद शेहजाद ४३५ धावांसह पाचव्या स्थानावर आहे.भारत आणि इंग्लंड यांच्यात खेळल्या जात असलेल्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिल्या दोन सामन्यांमध्ये जोस बटलरने चमकदार कामगिरी केली आहे. त्याने दोन्ही सामन्यात इंग्लंडकडून सर्वाधिक धावा केल्या. त्याने दोन सामन्यांत ५६ च्या सरासरीने ११३ धावा केल्या आहेतमात्र, त्याच्या या कामगिरीनंतरही इंग्लंड संघाला मालिकेत आतापर्यंत एकही सामना जिंकता आलेला नाही. तर तिसऱ्या टी-२० सामन्यात २४ धावांची खेळी केली आणि भारताला १७२ धावांचे लक्ष्य दिले आहे.इंग्लंड संघाने राजकोटमधील भारत वि इंग्लंड तिसऱ्या टी-२० सामन्यात टीम इंडियाला पराभवाचा धक्का दिला. इंग्लंडच्या गोलंदाजांनी तिसऱ्या टी-२० सामन्यात चांगली गोलंदाजी करत भारताच्या धावांवर अंकुश ठेवला आणि फलंदाजांना झटपट बाद करत मोठे फटके खेळण्याची संधी दिली नाही. अशारितीने इंग्लंडने दोन पराभवांनंतर चांगलं पुनरागमन करत मालिकेत आपलं खातं उघडलं आहे.१७२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाकडून अत्यंत खराब फलंदाजी पाहायला मिळाली. भारताचे दोन्ही सलामीवीर चांगली सुरूवात केल्यानंतर स्वस्तात बाद झाले. सलामीवीर संजू सॅमसनला ६ चेंडूत केवळ ३ धावा करता आल्या. त्याचवेळी अभिषेक शर्माही १४ चेंडूत २४ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यावेळीही कर्णधार सूर्यकुमार यादवला केवळ १४ धावाच करता आल्या.दुसरीकडे, तिलक वर्माने १४ चेंडूत १८ धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरनेही ६ तर अक्षर पटेलने केवळ ५ धावा केल्या. त्यामुळे भारतीय संघ २० षटकांत ९ विकेट गमावून केवळ १४५ धावा करू शकला आणि २६ धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. टीम इंडियाने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अर्शदीप सिंगच्या ऐवजी या सामन्यात मोहम्मद शमीला संधी देण्यात आली. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत चांगली धावसंख्या उभारली. सलामीवीर बेन डकेटने या सामन्यात आपल्या संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने २८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५१ धावा केल्या. लियाम लिव्हिंगस्टननेही २४ चेंडूत ४३ धावांची तुफानी खेळी केली. त्याचवेळी आदिल रशीद आणि मार्क वूड यांनीही प्रत्येकी १० धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### वरूणच्या कामगिरीवर फेरलं पाणी

टीम इंडियाने या सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अर्शदीप सिंगच्या ऐवजी या सामन्यात मोहम्मद शमीला संधी देण्यात आली. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करत चांगली धावसंख्या उभारली. सलामीवीर बेन डकेटने या सामन्यात आपल्या संघासाठी सर्वात मोठी खेळी खेळली. त्याने २८ चेंडूत ७ चौकार आणि २ षटकारांसह ५१ धावा केल्या. लियाम लिव्हिंगस्टननेही २४ चेंडूत ४३ धावांची तुफानी खेळी केली. त्याचवेळी आदिल रशीद आणि मार्क वूड यांनीही प्रत्येकी १० धावांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले. दुसरीकडे, वरुण चक्रवर्ती हा भारताकडून सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. या सामन्यात वरुण चक्रवर्तीने ४ षटकांच्या स्पेलमध्ये ६.०० च्या इकॉनॉमीसह केवळ २४ धावा दिल्या आणि ५ विकेट घेतले. हार्दिक पांड्यानेही 2 फलंदाजांना बाद करण्यात यश मिळवले. याशिवाय रवी बिश्नोई आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी १ विकेट घेतली.

# बाबा...विराट कोहली खरंच तुमचा मित्र आहे?

## दिल्लीत बालपणीच्या मित्राला पाहताच विराटने मारली मिठ्ठी

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली तब्बल १२ वर्षांनंतर रणजी ट्रॉफीमध्ये दिल्ली संघाकडून खेळण्यासाठी सज्ज झाला आहे. दिल्लीचा संघ ३० जानेवारीपासून होणाऱ्या सामन्यात रेल्वे संघाविरूद्ध खेळणार आहे. दरम्यान विराट कोहली अरूण जेटली स्टेडियममध्ये मंगळवारी सरावासाठी पोहोचला. यादरम्यान त्याने संघाबरोबर सराव केला तर त्याच्या काही जुन्या मित्रांनाही तो भेटला.**



त्याचा अंडर-१५ आणि अंडर-१७ संघातील मित्राने आणि त्याच्या लेकाने त्याची भेट घेतली, ज्याचे फोटो सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.विराट कोहली अरूण जेटली स्टेडियमवर रणजी सामन्यापूर्वीच्या सरावासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्याने स्टेडियमबाहेर मीडियाने प्रचंड गर्दी केली होती. विराट कोहली त्याच्या कारने स्टेडियमला पोहोचला. विराटला त्याच्या अंडर-१६ क्रिकेटपासून ओळखणारे दिल्ली संघाचे मॅनेजर महेश भाटी यांनी त्याचं स्वागत केलं आणि तितक्यात विराटने मजेशीर विनोद केल्याने दोघंही खळखळून हसताना दिसले. विराट कोहली सरावासाठी मैदानात उतरला तेव्हा संघ फुटबॉलचा सराव करत होता. भारतीय संघाचा भाग राहिलेला नवदीप सैनी आणि आरसीबीकडून एक सीझन खेळणार हिम्मत सिंग हे दोनच चेहरे विराटच्या परिचयाचे होते. इतर सर्व खेळाडूंची भेट घेत विराटनेही त्यांच्याबरोबर सरावाला सुरूवात केली.

त्यानंतर विराटने फुटबॉल खेळल्यानंतर नेटमध्ये बराच सराव केला. यादरम्यान स्टेडिमयबाहेरून विराटचं स्केच हातात घेऊन एक मुलगा उभा होता. हा आठ वर्षांचा मुलगा विराट कोहलीबरोबर क्रिकेट खेळलेल्या माजी क्रिकेटपटू शावेज खानचा मुलगा होता.

### दोघंही खळखळून हसताना दिसले

"बाबा विराट कोहली खरंच तुमचा मित्र आहे का", यावर शावेज म्हणाला, "त्याचा सराव झाला की तो आपल्याला भेटेल."शावेजने म्हटल्याप्रमाणे विराट कोहलीने सराव झाल्यानंतर ग्लोव्ह, पॅड बाजूला ठेवत जोरात शावेज म्हणून आवाज दिला. विराटने शावेजला आवाज दिलेला पाहताच त्याचा लेक आश्चर्यचकित झाला. भविष्यात क्रिकेटपटू होणाऱ्या असंख्य मुलांचा आदर्श असलेला विराट आपल्या वडिलांचा मित्र असलेला पाहून त्याचा लेक कबीर खूपच चकित झाला. तितक्यात शावेजने येताच विराटने त्याला घट्ट मिठी मारली.

## स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

# कलात्मकतेस चालना देणारे व्यासपीठ!

### डॉ. बी. बी. वाफरे : 'एमआयटी'मध्ये ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धा

**| पिंपरी-चिंचवड |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याचे मत एमआयटी कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालचे संचालक डॉ. बी. बी. वाफरे यांनी व्यक्त केले. ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेस चालना देणारा आणि त्यांच्यातील कल्पकतेला प्रोत्साहन देणारा एक आदर्श मंच असल्याचेही वाफरे म्हणाले.**






एम.आय.टी. कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात "ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी डॉ.बोलत होते.संगणक विज्ञान शाळेच्या अधिष्ठाता प्रा. रश्मी लाड, उपसंचालिका प्रा. अक्षदा कुलकर्णी, आणि प्रा. मानसी अतिकार यावेळी उपस्थित होते.

या मॉडेलच्या निर्मितीसाठी प्रा. निकिता देवरे, प्रा. प्रविन कार्ले, जयंत भुमकर, आणि महंत झडे. याचे मार्गदर्शक लाभले. विभाग प्रमुख प्रा. बरीन शेख यांनी स्पर्धाचे नेतृत्व केले . महाविद्यालचे संचालक डॉ. बी. बी. वाफरे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे आणि मेहनतीचे कौतुक करताना "ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याचे मत व्यक्त केले. ॲनिमेशन डिझाइन लघु सेट्स स्पर्धा विद्यार्थ्यांच्या कलात्मकतेस चालना देणारा आणि त्यांच्यातील कल्पकतेला प्रोत्साहन देणारा एक आदर्श मंच ठरला आहे असे उद्गार काढले. विद्यार्थ्यांना आपले कौशल्य-प्रतिभा सादरीकरणास व्यासपीठ..

एमआयटी महाविद्यालयाच्या माध्यमातून भरवण्यात आलेल्या या स्पर्धामध्ये डिझाइन, अनालिटिक्स, आणि सायबर सुरक्षा विभागाने ॲनिमेशन क्षेत्रातील विद्यार्थ्यांना आपले कौशल्य आणि प्रतिभा सादर करण्यासाठी एक अद्वितीय व्यासपीठ उपलब्ध करून दिले. ॲनिमेशन प्रकल्प ,विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पाच लघु सेट्स हे त्यांच्या ॲनिमेशन डिझाइन आणि कहाणी सांगण्याच्या कौशल्याचे उत्कृष्ट उदाहरण ठरले. हे सेट्स लोकप्रिय चित्रपट आणि कहाण्यांच्या प्रेरणेने विकसित करण्यात आले होते. गेम ऑफ थ्रोन्स, स्पेसशिप, जंगल बुक, ग्रीन स्क्रीन स्टुडिओ, हॉन्टेड हाऊस असे धडकी भरवणारे वातावरण निर्माण करणारे सेट विद्यार्थ्यांनी तयार केले होते. कार्यक्रमातील सर्वात विशेष आकर्षण उल्लेखनीय प्रकल्प म्हणजे जुने संसद भवनाचे अत्यंत बारकाईने तयार केलेले मॉडेल, ज्याने उपस्थितांच्या कौतुकाची दाद मिळवली.

## 'हुनर-2025'मधून विद्यार्थ्यांनी घडविले कलागुणांचे दर्शन

### एज्युकेशन कॅम्पस : गायत्री स्कूल मधील कौतुकास्पद उपक्रम

**| पिंपरी-चिंचवड |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज |**

**प्रजासत्ताक दिनानिमित्त गायत्री इंग्लिश मिडियम स्कुल व ज्युनिअर कॉलेज मोशी या शाळेने आयोजित केलेल्या हुनर 2025 या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचे दर्शन घडविले.**





गायत्री स्कूलच्या वतीने' हुनर-2025' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यातून विद्यार्थांचे कला प्रदर्शन तसेच ध्वजवंदनाच्या दिवशी शालेय मुलांचे विविध गुणदर्शन व साहसी खेळांचे सादरीकरण झाले. या प्रदर्शनाचे उदघाटन संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी कविता भोंगाळे कडू यांच्या हस्ते झाले.या प्रदर्शनासाठी कला शिक्षक उदय ठुबे व सोमनाथ वायदंडे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. अध्यक्ष विनायक भोंगाळे यांनी सर्वांना या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक केले.

'हुनर-2025 'या भव्य कला प्रदर्शनात 1ली ते 10वी च्या विद्यार्थ्यांच्या विविध कलाकृती व हस्तकला प्रदर्शनात सादर केल्या. त्यामध्ये ड्रॉईंग, 2D,3D,वर्क तसेच आर्ट ॲन्ड क्राप्ट, फोकआर्ट, वारली पेंटींग,मंडला आर्ट, वेस्ट टु बेस्ट,विविध किल्ले प्रतिकृती ,स्टोन डिझाईन,बॉटल डेकोरेशन वर्क विद्यार्थ्यांनी सादर केल्या. रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने व विद्यार्थ्यांचे कौतुक करुन कला प्रदर्शनाचा आनंद लुटत विद्यार्थ्यांच्या कला गुणांची स्तुती केली. विद्यार्थ्यांमध्ये चैतन्यमय वातावरण निर्मिती झाली. सर्व विभागाचे प्राचार्य ,शालेय प्रशासन ,शिक्षक विद्यार्थी यांनी सहकार्य केले.

# प्रियदर्शनी स्कूल आळंदी येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात

## देशाच्या सुरक्षेसाठी बलिदान दिलेल्या शहीदांना श्रद्धांजली



**। पिंपरी-चिंचवड**
**। प्रतिनिधी : महाईन्यूज**

प्रियदर्शनी स्कूल, आळंदी येथे स्वातंत्र्य, एकात्मता आणि देशभक्तीची भावना अंगीकारत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम त्या शहीद वीरांना श्रद्धांजली होता ज्यांच्या बलिदानामुळे देशाचा प्रवास घडला.

या सोहळ्याचे वैशिष्ट्य म्हणजे प्रमुख पाहुणे कर्नल वशिष्ठ यांची उपस्थिती होती. 1977 पासून ते 2011 मध्ये निवृत्तीपर्यंत भारतीय सैन्यात कार्यरत असलेले एक प्रतिष्ठित अधिकारी. त्यांचे देशाप्रती असलेले समर्पण आणि वचनबद्धता खरोखरच प्रेरणादायी होती आणि प्रत्येकाला त्या धैर्याची आणि चिकाटीची आठवण करून दिली. आमच्या स्वातंत्र्याचे रक्षण करा.

लोकशाही, एकात्मता आणि राष्ट्राभिमानाची त्यांची समज दाखवून विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारे प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सुंदरपणे सांगितले. त्यांच्या कामगिरीने आपल्या देशाला एकत्र बांधणारी मूल्ये प्रतिबिंबित केली आणि प्रेक्षकांना प्रेरणा आणि प्रेरणा दिली.



## प्रजासत्ताक दिनानिमित्त

# इंद्रायणीनगरमध्ये 350 फुट तिरंगा रॅली!

### रॅलीमध्ये 700 विद्यार्थ्यांचा सहभाग : अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतर्फे उपक्रम

। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**भारताच्या ७६ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने भोसरी इंद्रायणीनगर येथे ३५० फुट लांब भव्य तिरंगा रॅली सकाळी ९ ते ११ यावेळेत काढण्यात आली. यारॅलीमध्ये ७०० विद्यार्थी, शिक्षकांसह १००० जण यामध्ये उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते.**







या रॅलीमध्ये भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे, महापालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष विलास मडिगेरी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे इंद्रायणीनगर कार्यवाह गिरीश पटेल, प्रियदर्शनी इंग्लिश मिडियम स्कूलच्या मुख्याध्यापक ॲड. अर्पिता दीक्षित, मुख्याध्यापक जाधव मॅडम. उपमुख्याध्यापक पायल सिन्हा, सामाजिक कार्यकर्ते शिवराज लांडगे, अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेश मंत्री कुलकर्णी, शहर मंत्री सिद्धार्थ लाड, ओम रेड्डी, कार्तिक पवार संजय जगताप, अभिषेक मडिगेरी, ऋषभ जमदाडे यांच्यासह परिसरातील असंख्य नागरिक सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप...

इंद्रायणीनगर येथील प्रियदर्शनी शाळेपासून रॅलीला सुरुवात झाली. पुढे मिनि मार्केट, महा देव मंदिर, समर्थ कॉलनी, श्री स्मामी समर्थ शाळा, तिरुपती चौक मार्गे श्री वैष्णोमाता मंदिराजवळ आल्यानंतर तिरंगा रॅलीचा समारोप झाला. प्रियदर्शनी इंग्लिश मिडियम स्कूलचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने या रॅलीतत सहभागी झाले होते. तर, रॅलीच्या मार्गावर ठिकठिकाणी फुलांची उधळण करीत स्वागत करण्यात आले. सोबत साऊंड स्पीकर DJ वर देशभक्तीपर गाणे लावले होते शेवटी सहभागी सर्व विद्यार्थ्यांना पाणी व खाऊचे वाटप करण्यात आले.

---

## विद्यानिकेतन व विद्या व्हॅली स्कूलमध्ये ७६ व्या प्रजासत्ताक दिन साजरा

### भारताला जगातील सर्व संपन्न राष्ट्र, बनविण्यासाठी कटिबध्द होऊया, मान्यवरांच्या भावना

। चाकण । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**श्री.एस पी देशमुख शिक्षण संस्थेच्या विद्यानिकेतन स्कूल व विद्या व्हॅली स्कूलच्या प्रशालेमध्ये ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या दिमाखात आणि उत्साहात साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमांसाठी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय सैन्य दलातील कार्यरत अधिकारी तूषार फेंगसे (सुभेदार, मेजर) मोहनरावजी कुटे(माजी सैनिक) उपस्थित होते. त्यांच्यासमवेत एस. पी देशमुख शिक्षण संस्थेचे विश्वस्त आणि विद्यमान पदाधिकारी साहेबराव देशमुख (संस्थापक), शामराव देशमुख (अध्यक्ष), सुमनताई देशमुख (खजिनदार), रोहिणीताई देशमुख (सचिव), डि.पी.सोनवणे (संचालक) आदि मान्यवर उपस्थित होते.**



विद्या निकेतन इंग्लिश मीडियम स्कूलचे विद्यमान प्राचार्य दीपक शिंदे व विद्याव्हॅली इंटरनॅशनल स्कूल चाकणच्या विद्यमान प्राचार्या स्वाती रणदिवे यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाची सुरवात मुख्य अतिथी सुभेदार मेजर तुषार पिंगसे व मोहनराव कुटे यांच्या हस्ते ध्वजारोहनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिस्तबध्द संचालनाद्वारे राष्ट्रध्वजाला सलामी दिली. व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालनाची जबाबदारी इंग्रजी, हिंदी व मराठी या भाषेत उत्कृष्ट शब्दांची मांडणी करून इयत्ता ९ वी तील विद्यार्थी स्नेहल सहाने व शौर्य सुर्वे यांनी पार पाडली.

प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रभक्तीचा जागर करणारे व भारतीय संस्कृती आणि परंपरा यांचे प्रदर्शन करणारे मनमोहक चित्ररथाचे सादरीकरण करण्यात. यात महकुंभ मेळा, मराठी भाषा अभिजात दर्जा, ग्रंथ दिंडी,वारकरी संप्रदाय,विविधतेत एकता व स्वातंत्र्य सैनिक आदी चित्र रथाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. शाळेच्या सहशिक्षिका संध्या वाळुंज यांनी संविधानाबद्दल माहिती दिली त्यामध्ये २६ जानेवारी अर्थात प्रजासत्ताक दिन, प्रत्येक भारतीयांच्या मनात या दिवसाबद्दल विशेष आदर आहे. यादिवशी भारतीय राज्यघटना अस्तित्त्वात आली आणि भारत अधिकृतपणे सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक म्हणून घोषित करण्यात आला.संविधानाला अभिवादन केले जाते. असे त्यांनी त्यांच्या शब्दातून व्यक्त केले तसेच शपथही देण्यात आली.

# एनआयपीएम’ मुळे व्यावहारिक ज्ञान, कौशल्यात सुधारणा: कल्याण पवार

## शिक्षण विश्व: पीसीयूमध्ये एनआयपीएमची शाखा सुरु



**। पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंटची (एनआयपीएम) पिंपरी चिंचवड विद्यापीठातील शाखा मानव संसाधन व अन्य व्यवस्थापन क्षेत्रात करिअर करण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक संधी उपलब्ध करून देईल. विद्यार्थ्यांना उद्योगातील प्रमुख मानव संसाधन अधिकारी यांच्याशी व्यावसायिक संपर्क वाढविण्यास मार्गदर्शन व मदत करेल. या उद्योग प्रेरित उपक्रमांद्वारे प्रत्यक्ष अनुभव मिळतील व व्यावहारिक ज्ञान, कौशल्यात सुधारणा होतील. ज्यामुळे त्यांची रोजगार क्षमता वाढेल व स्पर्धात्मक जगात आणखी पुढे जाण्यास मदत होईल असे प्रतिपादन पीसीयु मधील एनआयपीएम चे अध्यक्ष कल्याण पवार यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या साते, वडगाव मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठामध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सनल मॅनेजमेंट (एनआयपीएम) च्या शाखेचे उद्‌घाटन करण्यात आले. या शाखेमुळे बीबीए व एमबीएच्या विद्यार्थ्यांना करिअर साठी व्यावसायिक नेटवर्किंग, उद्योगातील अनुभव आणि प्रगतीसाठी अभूतपूर्व संधी मिळतील.

उद्‌घाटन प्रसंगी पीसीयूच्या कुलगुरू, डॉ. मनीमाला पुरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, कल्याण पवार (अध्यक्ष), डॉ. कीर्ती धारवाडकर (उपाध्यक्ष), ॲड. प्रशांत क्षीरसागर (अतिरिक्त सचिव), सतीश पवार, किशोर केंचे, पवन शर्मा व वहीदा पठाण (कार्यकारी समिती सदस्य), स्कूल ऑफ मॅनेजमेंटचे प्रमुख, डॉ. अमित पाटील, समन्वयक डॉ. दीप्ती शर्मा व डॉ. सोनम सिंग आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. मनीमाला पुरी प्रास्ताविक करताना सांगितले की, अशा उपक्रमांतून करिअरसाठी व्यावसायिक नेटवर्किंग वाढवता येईल.

प्र-कुलगुरू, डॉ. सुदीप थेपडे म्हणाले की, स्पर्धात्मक बाजारात पुढे जाण्यासाठी एनआयपीएम मार्गदर्शकाची भूमिका करेल.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कर्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

